अर्धसाप्ताहिक

# ब्रम्हपुरी समाचार

संपादक
अशोक भैया

RNI No. MAHMUL/2016/69789

E-Mail ID : bramhapurisamachar@gmail.com

Postal Regd. No. G2/47/CHD-283/2023-25

गुरूवार, दि. 26 फेब्रुवारी 2026 | वर्ष 11 वे | अंक 28 वा | ब्रम्हपुरी | पाने 6 | किंमत 2 रूपये

## ब्रम्हपुरी नगर परिषदेचा कारभार 'रामभरोसे'

### आरोग्य विभाग अधिकाऱ्याविना पोरका, तर बांधकाम विभागाला 'उधारी'चा अभियंता!

ब्रम्हपुरी/का.प्र.

नगर परिषदेच्या प्रशासकीय यंत्रणेला सध्या रिक्त पदांचे ग्रहण लागले आहे. शहरातील स्वच्छतेची धुरा सांभाळणारा आरोग्य निरीक्षक नसल्याने आरोग्य व्यवस्था व्हेंटिलेटरवर आली आहे, तर बांधकाम विभागाचा डोलारा सिंदेवाहीवरून येणाऱ्या 'प्रभारी' अभियंत्यांच्या खांद्यावर टिकून आहे. या वरिष्ठ पदांच्या रिक्ततेमुळे ब्रम्हपुरीकरांना नागरी सुविधांसाठी मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे. ब्रम्हपुरी नगर परिषदेत आरोग्य निरीक्षक हे अत्यंत महत्त्वाचे पद दीर्घकाळापासून रिक्त आहे. शहराचा विस्तार आणि वाढती लोकसंख्या लक्षात घेता कचरा व्यवस्थापन, नाल्यांची सफाई



आणि सार्वजनिक आरोग्यावर देखरेख ठेवण्यासाठी पूर्णवेळ अधिकारी असणे अनिवार्य आहे. मात्र, हे पद भरले नसल्याने शहरातील अनेक प्रभागांत कचऱ्याचे ढीग साचले आहेत. नियमित फवारणी आणि स्वच्छता मोहिमांचा अभाव दिसून येत आहे. आरोग्य विषयक तक्रारींचे निवारण करण्यासाठी नागरिकांना दाद मागण्याकरिता हक्काचा अधिकारी उपलब्ध नाही.

**बांधकाम विभागाला 'प्रभारी'चा आधार :**

केवळ आरोग्यच नव्हे, तर शहराच्या विकासाचा कणा असलेला बांधकाम विभागही कायमस्वरूपी अभियंत्याविना रखडला आहे. येथील बांधकाम अभियंता पद रिक्त असल्याने, याचा अतिरिक्त पदभार सिंदेवाही नगर पंचायतीचे अभियंता मनोज आंभोरकर यांच्याकडे सोपवण्यात आला आहे. आंभोरकर यांच्याकडे दोन ठिकाणची जबाबदारी असल्याने ब्रम्हपुरीच्या विकासकामांच्या फायलींचा निपटारा संथ गतीने होत आहे. तांत्रिक मंजुरी आणि प्रत्यक्ष कामाची पाहणी यासाठी अभियंत्यांची उपलब्धता नसल्याने कंत्राटदार आणि नागरिक दोघेही त्रस्त आहेत.

**नागरिकांच्या समस्यांत वाढ :**

आरोग्य आणि बांधकाम हे दोन विभाग थेट सामान्य जनतेच्या जीवनाशी निगडित आहेत. एकीकडे साथीच्या आजारांचा धोका वाढत असताना आरोग्य विभागात शुकशुकाट आहे, तर दुसरीकडे मूलभूत पायाभूत सुविधांच्या कामांना 'प्रभारी' राजमुळे ब्रेक लागला आहे. ब्रम्हपुरी नगर परिषदेतील ही रिक्त पदे तातडीने भरून प्रशासकीय कामात सुसूत्रता आणली जाईल का? की ब्रम्हपुरीकरांना अशाच समस्यांचा सामना करावा लागेल? याकडे आता सर्वांचे लक्ष लागून आहे.

> **'शहराच्या नियोजनासाठी पूर्णवेळ अधिकारी असणे गरजेचे आहे. प्रभारी अधिकाऱ्यांमुळे कामात दिरंगाई होते आणि जबाबदारी निश्चित करता येत नाही. शासनाने त्वरित या जागा भराव्यात.'**
>
> **- स्थानिक नागरिक**

## ब्रम्हपुरी जिल्हा निर्मितीचा लढा तीव्र, मुख्यमंत्र्यांना पाठविणार १ लाख पत्रे

### २७ फेब्रुवारीला तहसिल कार्यालयावर धडक

ब्रह्मपुरी/का.प्र.

चंद्रपूर जिल्ह्याचे विभाजन करून ब्रह्मपुरी जिल्ह्याची निर्मिती व्हावी, या मागणीसाठी 'ब्रह्मपुरी जिल्हा निर्माण संघर्ष समिती'ची महत्त्वपूर्ण सभा शासकीय विश्रामगृह येथे हरिश्चंद्र चोले सर यांच्या अध्यक्षतेखाली आणि विनोदभाऊ झोडगे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. या सभेला प्रमुख अतिथी म्हणून प्रशांत डांगे उपस्थित होते.

या बैठकीत ब्रह्मपुरी जिल्ह्याच्या मागणीसाठी लोकचळवळ उभी करण्यावर सविस्तर चर्चा होऊन अनेक महत्त्वपूर्ण ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आले. सभेत घेण्यात आलेले ऐतिहासिक निर्णयामध्ये **लोकशाहीचा जागर:** जिल्हा निर्मितीच्या मागणीसाठी महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांना तब्बल १ लाख पत्रे पाठवण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. **ग्रामपंचायत ठराव:** ग्रामीण भागातील पाठिंबा दर्शवण्यासाठी प्रत्येक ग्रामपंचायतीने जिल्हा निर्मितीचा ठराव घ्यावा, यासाठी गटविकास अधिकारी साहेबांना निवेदन दिले जाईल. **नगर परिषद सहभाग:** ब्रह्मपुरी नगर परिषदेनेही या मागणीचा अधिकृत ठराव घ्यावा, यासाठी नगराध्यक्ष व मुख्याधिकारी यांची भेट घेतली जाईल. **तालुका निर्मिती:** विद्यमान ब्रह्मपुरी, नागभिड, सिंदेवाही या तालुक्याचे विभाजन करून अधिक तालुके मेंडकी, मुडझा, तळोधी (बाळापुर), नवरगाव, निर्माण करण्यासाठी शासन स्तरावर प्रयत्न करण्याचे ठरले. **समन्वय व प्रचार:** नागभीड, सिंदेवाही, सावली आणि तळोधी, मेंडकी, हळदा, नवरगाव, परिसरातील जनतेचा पाठिंबा मिळवून समन्वय साधला जाईल. **२७ फेब्रुवारीला तहसीलवर धडक:** येत्या २७ फेब्रुवारी रोजी दुपारी १:०० वाजता उपविभागीय अधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्री आणि महसूल मंत्रांना निवेदन दिले जाणार आहे. या ऐतिहासिक क्षणी सर्व जिल्हाप्रेमी नागरिकांनी तहसील कार्यालयात मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

यावेळी विनोद झोडगे, शंकरराव उराडे, कोडापे साहेब, प्रा. सुयोग बाळबुद्धे, मनोज भूपाल, भगवानजी कन्नाके, सुवर्णा देशमुख, ढोमणे सर, झलके साहेब, डॉ. बाळकृष्ण शेळके, विहार मेश्राम, अमोल मोटघरे यांनी आपले विचार व्यक्त केले. सभेचे प्रास्ताविक, संचालन व आभार प्रदर्शन राजू भागवत सर (सल्लागार तथा कोषाध्यक्ष) यांनी केले.




झाडे लावा, झाडे जगवा...

संपादकीय...

# राज्यातील कमकुवत विरोधी पक्ष

राज्याचे पुढील वर्षांचे अर्थकारण ठरविणारे अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू झाले. विधानसभेतील संख्याबळ आणि त्याअभावी विरोधी पक्षनेतेपदाचा कमकुवत रेटा पाहता सरकारसाठी अधिवेशनाचे कोणतेही सत्र आव्हानात्मक नसणार आहे. खरे तर हे अधिवेशन विरोधकांची कसोटी पाहणारे आहे. वास्तविक बजेट आणि एकूणच सत्ताधाऱ्यांना कोंडीत पकडण्याची संधी होती. पण याच अधिवेशनादरम्यानच राज्यसभेसाठी निवडणूक होणार असल्याने विरोधकांची सगळी ताकद आपापसातील समन्वय आणि एकजूट कायम राखण्यातच खर्च होण्याची शक्यता आहे. सरकारला घेरण्यासाठी तसे अनेक मुद्दे विरोधी पक्षांकडे आहेत, परंतु सरकारला नमविण्याइतपत ताकद विरोधकांकडे नाही. त्यातच अजितदादा पवार यांच्या निधनानंतर दोन्ही राष्ट्रवादी एकत्रिकरण, विलीनीकरणाचा विषय अधिक चर्चेचा आहे. तसे असेल तर खा. शरद पवार गटाची भूमिका काय असेल, हा देखील एक प्रश्न आहेच.

राज्यसभेतून शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे दोन सदस्य निवृत्त होत आहेत आणि आता एकही सदस्य निवडल्या गेला नाही तर राज्यसभेतून शरद पवार गटाचा आवाजच बाद होईल. शरद पवार गटाचा विलिनीकरणावर त्यासाठीच जोर होता. शिवाय मविआकडून शरद पवारांना राज्यसभेवर निवडून दिले आणि पुढच्या काळात दोन्ही राष्ट्रवादीचे विलिनीकरण झाले तर त्याचा फटका विरोधकांनाच बसणार आहे. काँग्रेसचे नेते ही शंका व्यक्त करीत आहेत. त्यातूनच शरद पवार गटाला बाजूला ठेवून काँग्रेस आणि शिवसेना ठाकरे गट राज्यसभा आणि पुढच्या विधान परिषद निवडणुकीसाठी बोलणी करीत असल्याची चर्चा आहे. राज्यसभेसाठी काँग्रेस उमेदवाराला समर्थन द्यायचे आणि विधान परिषदेसाठी उध्दव ठाकरेंचा मार्ग मोकळा करायचा, अशा स्वरूपाचे काही सूत्र ठरत असल्याची चर्चा आहे.

अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला विरोधकांची जी पत्रकार परिषद पार पडली. त्यावेळी शरद पवार गटाचे प्रतिनिधी उपस्थित नव्हते. त्यामुळे विरोधकांमधील समन्वयाचा मुद्दा चर्चेत येत आहे. ही राज्यसभा निवडणूक महाविकास आघाडीची परीक्षा पाहणारी आहे. त्यामुळे या निवडणुकीचा प्रभाव सभागृहातील कामकाजावरही पाहायला मिळू शकतो. पत्रकार परिषदेत विरोधी नेत्यांनी आक्रमकपणे आपली भूमिका मांडली खरी परंतु सभागृहात ते कितपत आक्रमक राहतात, कितपत एकजूट राहतात याबद्दल साशंकताच आहे. यावेळीही कदाचित दोन्ही सभागृहातील विरोधी पक्षनेते पदावरून खडाजंगी होऊ शकते, परंतु विधानसभा अध्यक्ष विरोधकांना दाद देतील असे वाटत नाही. आतापर्यंतचा एकूणच अनुभव पाहता हे स्पष्ट होते.

मागच्या वेळी या मुद्यावर मार्ग निघण्याची शक्यता निर्माण झाली होती. विरोधकांनी भास्कर जाधव यांच्याऐवजी अन्य कुणाचे नाव सुचवावे असे सत्ताधारी पक्षाकडून अप्रत्यक्षरित्या सांगण्यात आले होते, परंतु ठाकरे गट भास्कर जाधवांच्या नावावर ठाम राहिला. ठाकरे गटाची ती भूमिका आताही कायम राहिली तर याही वेळेस विधानसभेतील विरोधी पक्षनेतेपद रिक्तच राहण्याची शक्यता आहे. परिषदेतही सतेज पाटलांना संधी दिली जाईल असे वाटत नाही. एवढेच काय तर मागच्या काळात सभागृहात विरोधकांमध्ये थोडा फार समन्वय दिसला, एकजूट दिसली, पण यावेळी परिस्थिती पूर्ण वेगळी दिसून येते. राज्यसभा आणि विधान परिषद निवडणुकीच्या तोंडावर आपल्या पक्षाच्या दावेदारांना संधी मिळावी यासाठी तीनही पक्ष आग्रही आहेत. त्यामुळे यावेळी विरोधक अधिकच विस्कळीत झालेले दिसतात. शरद पवार गटाची तळ्यात मळ्यात भूमिका, चंद्रपूर महापालिकेत काँग्रेसला उद्धव ठाकरे गटाने दगा देत महायुतीच्या दिशेने वाटचाल करीत भाजपला सीध देत ठाकरे गट आणि काँग्रेसमध्ये निर्माण झालेला तणाव याचा परिणाम कामकाजात दिसू शकतो.

अर्धसाप्ताहिक ब्रम्हपुरी समाचार वाचा या लिंक वर...
www.bramhapurisamachar.com/bs

# ने.हि. महाविद्यालयात निबंध स्पर्धेचे बक्षीस वितरण

ब्रह्मपुरी/का.प्र.

येथील नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालयात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३९६ व्या जयंतीनिमित्त सांस्कृतिक विभागाच्यावतीने 'शककर्ते छत्रपती शिवराय' या विषयावर निबंध लेखन स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेमध्ये प्रथम पुरस्कार कु.माहीन सलाम शेख, द्वितीय पुरस्कार किशोरी अनिल मडावी, तृतीय पुरस्कार रूपाली बाबुराव मडावी तर उत्तेजनार्थ पुरस्कार कृष्णम्माकल्याणी राऊत व खुशी घोरमोडे हिने पटकावला. याप्रसंगी पुरस्कार प्राप्त विद्यार्थ्यांना छत्रपती शिवाजी महाराज यांची आकर्षक प्रतिमा, पुस्तक व प्रमाणपत्र भेट म्हणून दिले गेले. निबंध लेखन स्पर्धेमध्ये एकूण ५१ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.




या जयंती उत्सव कार्यक्रमांमध्ये इतिहास विभागप्रमुख डॉ.मोहन कापगते व कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.एस.एम शेकोकर यांनी श्रोत्यांना अनमोल मार्गदर्शन केले. या स्पर्धेच्या यशस्वीकरिता सांस्कृतिक विभागप्रमुख डॉ. पद्माकर वानखडे, निबंध लेखन मूल्यमापनाकरिता डॉ.मोहन कापगते, डॉ.सुनील चौधरी, प्रा. बालाजी दमकोंडवार यांचे सहकार्य मिळाले. छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्सव समिती अध्यक्ष डॉ. सुभाष शेकोकर व सर्व सदस्यांनी मोलाची भूमिका पार पाडली. या कार्यक्रमामध्ये बहुसंख्य श्रोतृवर्ग उपस्थित होता.

कार्यक्रमाला प्रा मेजर विनोद नरड, डॉ रेखा मेश्राम, डॉ राजेंद्र डांगे, डॉ धनराज खानोरकर, डॉ असलम शेख, डॉ भास्कर लेनगुरे, डॉ योगेश ठावरी, डॉ युवराज मेश्राम, डॉ कुलजित शर्मा, डॉ अजित खाजगीवाले, डॉ मिलिंद पठाडे, डॉ किशोर नाकतोडे, डॉ वर्षा चंदनशिवे, डॉ दर्शना उराडे, पर्यवेक्षक प्रा आनंद भोयर, डॉ ज्योती दुपारे, अधीक्षक संगीता ठाकरे, रुपेश चामलाटे, सुषमा राऊत व इतर मान्यवर उपस्थित होते. प्रास्ताविक डॉ पद्माकर वानखडे तर संचालन व आभार प्रदर्शन शशिकांत माडेंनी केले.

**जल है तो कल है...**

# भांडी संचासाठी बांधकाम कामगारांचा शेकडो किमीचा प्रवास

## तालुकास्तरावर सुविधा देण्याची मागणी

ब्रह्मपुरी/का.प्र.

महाराष्ट्र शासन कामगार कल्याण मंडळाच्या वतीने नोंदणीकृत बांधकाम कामगारांसाठी विविध कल्याणकारी योजना राबविल्या जातात. मात्र, या योजनांचा लाभ घेण्यासाठी ब्रह्मपुरीतील कामगारांना अक्षरशः अग्निपरीक्षेला सामोरे जावे लागत आहे. गृहपयोगी भांडी संच आणि इतर साहित्य मिळवण्यासाठी कामगारांना चक्क १२५ ते १५० किलोमीटर दूर असलेल्या चंद्रपूर जिल्हा मुख्यालयाची वारी करावी लागत असल्याने कामगारांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

ब्रह्मपुरी तालुका हा जिल्ह्याच्या शेवटच्या टोकावर वसलेला आहे. जिल्हा मुख्यालयाला जाण्यासाठी कामगारांना मोठा प्रवास खर्च करावा लागतो. यात भर म्हणजे, दिवसभराची हक्काची मजुरी बुडते आणि जिल्हा ठिकाणी पोहोचल्यावर तिथे होणारी प्रचंड गर्दी पाहून कामगारांचे अवसान गळते. अनेकदा दिवसभर रांगेत उभे राहूनही साहित्य मिळत नसल्याने रिकाम्या हाताने परतावे लागते. यामुळे शासनाच्या या 'कल्याणकारी' योजनेचा मूळ उद्देशच फोल ठरत असल्याची भावना सामान्य मजूर व्यक्त करत आहेत.

संपूर्ण जिल्ह्यातील कामगार एकाच ठिकाणी जमा होत असल्याने तिथे नियोजनाचा अभाव दिसून येतो. प्रवासात आणि रांगेत उभे राहण्यात दोन ते तीन दिवस वाया जातात. मिळणाऱ्या साहित्याच्या किमतीपेक्षा प्रवासाचा आणि खाण्यापिण्याचा खर्च अधिक होत आहे. निवडणुकीत मोठे आश्वासन देणारे राजकीय पुढारी या ज्वलंत प्रश्नावर मूग गिळून गप्प असल्याची टीका कामगारांनी केली आहे. या बांधकाम कामगारांच्या प्रमुख समस्या व कामगारांच्या तक्रारी आहेत.

ज्या तालुक्याच्या ठिकाणी कामगार कल्याण कार्यालय उपलब्ध आहे, त्याच कार्यालयामार्फत नोंदणीकृत कामगारांना गृहपयोगी संच आणि इतर साहित्याचे वितरण करण्यात यावे, अशी एकमुखी मागणी आता जोर धरत आहे. असे झाल्यास कामगारांचा वेळ, पैसा आणि त्रास वाचेल व खऱ्या अर्थाने गरजूंपर्यंत ही योजना पोहोचू शकेल. बांधकाम कामगार हा समाजाचा कणा असून त्यांच्या कष्टावरच विकास उभा राहतो. आता या श्रमिकांच्या समस्यांकडे शासन आणि संबंधित अधिकारी गांभीर्याने लक्ष देऊन तालुका स्तरावर वितरण व्यवस्था सुरू करतात का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## विनोदिनी

एक शादीशुदा आदमी का अपनी सेक्रेटरी के साथ अफेयर था...
एक दिन वो लोग डेट पर गए और एक साथ काफी समय बिताया जिसमें रात के ८ बज गए....
घर वापस जाते समय आदमी ने अपने जूते और कपड़े धूल और घास में रगड़ दिए...
घर पहुंचने पर पत्नी ने पूछा 'इतनी देर क्यों हो गई, कहां थे आप?'
आदमी : मैं तुमसे झूठ नहीं बोल सकता हूं. मेरा एक अफेयर है और मैं अभी एक डेट से ही वापस आ रहा हूं..
पत्नी ने उसकी तरफ देखा और चिल्लाई : झूठे, क्रिकेट खेल के आ रहे हो ना...!!

# छत्रपतींच्या नावाच्या चौकात शिवरायांचे स्मारक झालंच पाहिजे : ब्रम्हपुरीत शिवगर्जना

## पुढच्या शिवजयंतीपर्यंत निर्णय न घेतल्यास लोकवगर्णीतून स्मारक उभारण्याचा शिवप्रेमींचा निर्धार

ब्रम्हपुरी/का.प्र.

ज्या चौकाच्या नावाने शहराची ओळख आहे, त्याच ठिकाणी आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांचे स्मारक नसावे, ही बाब आता ब्रम्हपुरीतील शिवप्रेमींनी गांभीर्याने घेतली आहे. २० फेब्रुवारी रोजी शहरातील शेकडो शिवप्रेमींनी एकवटून नगरपरिषदेवर धडक दिली आणि मुख्याधिकाऱ्यांना स्मारकाबाबतचे निवेदन सादर केले.



निवेदन देण्यापूर्वी शिवप्रेमींनी नगरपरिषद परिसरातील छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि महात्मा गांधी यांच्या पुतळ्यांना पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले. यावेळी कार्यकर्त्यांनी दिलेल्या 'छत्रपती शिवाजी महाराज की जय' आणि 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा विजय असो' अशा घोषणांनी संपूर्ण परिसर शिवमय आणि ऊर्जेने भरून गेला होता. शिवप्रेमींनी आपल्या निवेदनात प्रशासनाकडे काही महत्त्वाचे मुद्दे मांडले. यात अनेक वर्षांपासून या चौकाचे नाव 'छत्रपती शिवाजी महाराज चौक' असतानाही तिथे स्मारक नसणे ही खेदजनक बाब आहे. महाराजांचे स्मारक हे केवळ एक शिल्प नसून ते स्वराज्य, न्याय आणि सुशासनाचे प्रतीक आहे, जे येणाऱ्या पिढीला प्रेरणा देईल. भव्य स्मारकामुळे शहराच्या सांस्कृतिक वैभवात भर पडेल. निवेदन स्वीकारताना मुख्याधिकाऱ्यांनी या विषयावर तातडीने प्रशासकीय कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले आहे. याप्रसंगी नगराध्यक्ष योगेश मिसार आणि नगरसेवक मनोज भूपाल यांची उपस्थिती लक्षणीय होती.

मात्र, केवळ आश्वासनावर समाधान न मानता शिवप्रेमींनी प्रशासनाला स्पष्ट इशारा दिला आहे की, जर पुढच्या शिवजयंतीपर्यंत स्मारकाचे काम मार्गी लागले नाही, तर शासन दरबारी न थांबता 'लोकवर्गणी' गोळा करून शिवप्रेमी स्वखर्चाने भव्य स्मारक उभारतील. स्मारक उभारणे ही केवळ मागणी नसून तो आमच्या अस्मितेचा प्रश्न आहे. प्रशासनाने आता सकारात्मक पाऊल उचलण्याची वेळ आल्याचे मत शिवप्रेमींनी व्यक्त केले.

## संत गाडगे बाबा चालते-बोलते ज्ञानपीठ - डॉ. शेकोकर



ब्रह्मपुरी/का.प्र.

'भूकेल्यांना अन्न द्या, तहानलेल्यांना पाणी द्या, गरिबांच्या मुलांना शिक्षण द्या! असे सतत सांगणारे आणि अंधश्रद्धा निर्मूलनाचे कार्य आयुष्यभर करणारे समाजसंत गाडगेबाबा हे खरे आधुनिक संत होते. शिक्षणाचा सतत आग्रह त्यांनी धरला. आपल्या कीर्तनातून स्वच्छतेचा मंत्र आणि ग्यानतंत्र देणारे ते खरे ज्ञानपीठ होते', असे विचार प्राचार्य डॉ सुभाष शेकोकर यांनी नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालयात संत गाडगेबाबा जयंतीदिनी केले.

यावेळी विचारपीठावर मार्गदर्शक म्हणून डॉ.धनराज खानोरकर, डॉ.युवराज मेश्राम उपस्थित होते. यावेळी डॉ खानोरकरांनी संत हे अनंत असतात. जगाचे आघात सोसून मानवी जीवन उध्दाराच्या वाटा सुकर करण्यासाठी संत गाडगेबाबा झिजले. झाडूतंत्र आणि शिक्षणमंत्र त्यांनी उभ्या महाराष्ट्राला सांगीतला, असे विचार मांडले. डॉ.मेश्रामांनी, विद्यार्थ्यांनी संत गाडगेबाबा यांच्याकडून प्रेरणा घेऊन आपलं जीवन सफल करण्याचा सल्ला दिला. महाविद्यालयात सर्वांच्या उपस्थितीत प्राचार्य कक्षासमोर हा जयंती कार्यक्रम घेऊन गाडगेबाबांना अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन डॉ युवराज मेश्राम यांनी तर उपस्थितांचे आभार जगदिश गुरनुलेंनी मानले. कार्यक्रमाला बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.

## स्वा. सावरकर पुण्यतिथी दिनाचे आयोजन

ब्रम्हपुरी/का.प्र.

स्वातंत्र्यवीर सावरकर उत्सव समिती तथा भारतीय विचार मंच शाखा ब्रम्हपुरी यांच्या संयुक्त विद्यमाने स्वातंत्र्यवीर सावरकर पुण्यतिथी गुरुवार, दिनांक २६ फेब्रुवारी २०२६ सायंकाळी ६ वाजता स्वा. वि. दा. सावरकर चौक येथे आयोजन केले आहे. या कार्यक्रमाला उद्बोधन म्हणून कु. समीक्षा पंडित वक्तत्व स्पर्धा पुरस्कार विजेत्या ह्या लाभलेल्या आहे.

तरी या कार्यक्रमाला नगरातील बंधू भगिनींनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहून या उद्बोधनाचा लाभ घ्यावा असे आवाहन वामनराव भुसारी संयोजक स्वातंत्र्यवीर सावरकर उत्सव समिती तसेच राजेश देऊरकर जिल्हा संयोजक भारतीय विचार मंच यांनी केले आहे.

## संत निरंकारी मिशनकडून बारई तलावाची स्वच्छता



ब्रम्हपुरी/का.प्र.

संत निरंकारी मिशन तर्फे दरवर्षी २३ फेब्रुवारी रोजी गुरू पूजा दिवस संपूर्ण विश्वात विविध सेवा उपक्रमांनी साजरा केला जातो. यावर्षीही 'प्रोजेक्ट अमृत – स्वच्छ जल, स्वच्छ मन' या संकल्पनेअंतर्गत जलस्रोत स्वच्छता अभियान राबविण्यात आले.

या उपक्रमाअंतर्गत संत निरंकारी मिशन ब्रम्हपुरी शाखेच्या वतीने स्थानिक बारई तलावाची स्वच्छता करण्यात आली. मिशनच्या सेवादल व अनुयायांनी सकाळी ८ वाजता प्रार्थना करून सद्गुरू माता सविंदर हरदेव सिंह जी महाराज यांना नमन केले व स्वच्छता अभियानास सुरुवात केली. सुमारे तीन तास चाललेल्या या अभियानाची सांगता सकाळी ११ वाजता झाली. या उपक्रमात नगरपरिषद ब्रम्हपुरी यांचेही सहकार्य लाभले. त्यानंतर हरीशजी निरंकारी (क्षेत्रीय संचालक, वडसा झोन) यांच्या प्रमुख उपस्थितीत सत्संग कार्यक्रम संपन्न झाला.

या प्रसंगी ब्रम्हपुरी शाखा प्रमुख सुयोग बाळबुध्दे, सेवादल इंचार्ज नितीन रासेकर तसेच ब्रम्हपुरी येथील नवनियुक्त नगरसेवक मनोज भूपाल उपस्थित होते. बेटाळा, रानबोथली, वाढोना, मालडोंगरी, नागभीड, बोरगाव, उदापूर आदी गावांमधील निरंकारी मिशनचे शेकडो अनुयायी मोठ्या उत्साहात सहभागी झाले.

## जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनी ओंकार दिघोरेचे यश

ब्रह्मपुरी/का.प्र.

५३ वे जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शन सेंट क्लेरेट स्कूल चिमूर येथे नुकतेच पार पडले. सदर प्रदर्शनी मध्ये जिल्ह्यातील १५ तालुक्यामधील प्राथमिक गटातील व माध्यमिक गटातील विविध विद्यार्थ्यांनी आपल्या वैज्ञानिक प्रतिकृतीसह प्रदर्शनी मध्ये सहभाग घेतलेला होता.




या प्रदर्शनीमध्ये वर्ग ९ वी ते १२ वी च्या माध्यमिक गटात ख्रिस्तानंद स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज ब्रह्मपुरी येथील वर्ग दहावीचा विद्यार्थी ओंकार प्रमोद दिघोरे याने जिल्ह्यातून प्रथम क्रमांक प्राप्त केला. त्याने 'रोड वाइल्ड मिल' या संकल्पनेवर आधारित वैज्ञानिक प्रतिकृती तयार केलेली होती. समारोपीय कार्यक्रमामध्ये मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन ओंकार चा गौरव करण्यात आला.

राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनी श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती संचालित विज्ञान महाविद्यालय काँग्रेस नगर,नागपूर येथे होणार असून ओंकार चंद्रपूर जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करणार आहे. ओंकारला मार्गदर्शक म्हणून शाळेतील विज्ञान शिक्षिका संगीता निखारे व लेकराम डेंगे यांचे सहकार्य लाभले. त्याच्या यशाबद्दल ब्रम्हपुरी पंचायत समितीच्या गटशिक्षणाधिकारी डॉ.विद्या शेळके, शाळेचे व्यवस्थापक फादर कुरिअन, मुख्याध्यापिका सिस्टर पावना, उपमुख्याध्यापिका सिस्टर अंजली तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी कौतुक केले आहे.

ब्रम्हपुरी समाचारच्या अंकाकरीता
www.bramhapuri samachar.com/bs

हम दो, हमारा एक

# ब्रम्हपुरी तालुक्यात ठिकठिकाणी छत्रपती शिवाजी महाराजांना मानवंदना



**नेवजाबाई हितकारणी विद्यालय :** दिनांक १९ फेब्रुवारी २०२६ रोज गुरुवारला नेवजाबाई हितकारीणी माध्यमिक तथा उच्च माध्यमिक विद्यालय ब्रह्मपुरी येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या वेळेस शाळेचे मुख्याध्यापक नाईक सर,उपमुख्याध्यापक नाकाडे सर तसेच पर्यवेक्षक जीभकाटे सर उपस्थित होते.

कार्यक्रमा प्रसंगी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. दोनाडकर सर, सिंदीमेश्राम सर त्याचप्रमाणे बालपांडे मॅडम यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकला. कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून लाभलेले नाईक सर यांनी सुद्धा छत्रपती शिवाजी महाराज यांच्याविषयी खूप मोलाची माहिती दिली.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षिका तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे मोलाचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बोरकर सर यांनी केले तर आभार प्रदर्शन राऊत सर यांनी केले.

**नगर परिषद कार्यालय, ब्रम्हपुरी :** नगरपरिषद ब्रम्हपुरी कार्यालयात दिनांक १९ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९६ वी जयंती मोठ्या उत्साहात व दिमाखात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नगराध्यक्ष योगेश मिसार होते. यावेळी उपाध्यक्ष डॉ. नितीन उराडे, नगरपरिषद मुख्याधिकारी डॉ. माधुरी सलामे, तसेच सर्व सन्माननीय नगरसेवक, नगरपरिषद अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी नगर परिषदेच्या प्रांगणातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वरूढ पुतळयास तसेच प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. उपस्थित मान्यवरांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या कार्याचा व विचारांचा गौरव करत त्यांच्या आदर्शांवर चालण्याचे आवाहन केले. समाजहित, स्वराज्य, न्यायनिष्ठा व लोककल्याणकारी प्रशासन या मूल्यांचे अनुकरण करण्याची गरज असल्याचे यावेळी वक्त्यांनी नमूद केले.

छत्रपती शिवाजी महाराज जयंतीचे औचित्य साधून नगरपरिषद ब्रम्हपुरी व अशोक नेत्रालय यांच्या संयुक्त विद्यमाने नगरपरिषद सफाई कर्मचाऱ्यांसाठी मोफत नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन आरोग्य सभापती मनोज कावळे यांच्या मार्गदर्शनाखाली अशोक नेत्रालय ब्रम्हपुरीचे डॉ. स्वप्निल कवठे व डॉ. रोहिणी कवठे यांच्या पुढाकारातून नगरपरिषद ब्रम्हपुरी कार्यालयात करण्यात आले. शहराची स्वच्छता राखण्यासाठी स्वत:चे आरोग्य धोक्यात घालून सेवा देणाऱ्या सफाई कर्मचाऱ्यांच्या आरोग्य संवर्धनाच्या दृष्टीने हा उपक्रम राबविण्यात आला.

**बाल हौशी बहुउद्देशीय मंडळ चिखलगाव :** ब्रम्हपुरी तालुक्यातील चिखलगाव येथे बाल हौशी बहुउद्देशीय मंडळ चिखलगाव यांच्या वतीने गावातील मुख्य चौकातील रंगमंच बाजूला शिवजयंतीचे औचित्य साधून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुर्णाकृती पुतळयाचे अनावरण जिल्हा परिषद चंद्रपूरचे माजी अध्यक्ष सतीश वारजुरकर यांच्या हस्ते, प्रमोद चिमुरकर ,नगराध्यक्ष योगेश मिसार यांचे प्रमुख उपस्थितीत प्राचार्य नामदेव कोकोडे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडले.

यावेळी नगर सेवक राकेश पडोळे, अविनाश राऊत, जयश्री कुथे, रागिणी ठेंगरे सह सुनील धांडे, नेताजी मेश्राम, यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. शिवजयंती निमित्याने गावात मिरवणूक, विविध स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

प्रास्तविक भास्कर नाकतोडे, संचालन ओमप्रकाश ढोरे तर आभार प्रदर्शन मोहुरले यांनी केले.

**एल.एम.बी. स्कुल ब्रम्हपुरी :** येथील एल. एम. बी. पब्लिक स्कुल, ब्रम्हपुरी येथे १६ फेब्रुवारी ला शिवाजी जयंतीचा कार्यक्रम पार पडला. शाळेच्या वतीने प्राचार्य कादिर कुरेशी सर, उपप्राचार्य रश्मी राठी मॅडम आणि पर्यवेक्षिका रश्मी झोडे मॅडम यांनी प्रतिमेला पुष्पहार अर्पण केले.

प्रत्युक्ष दोनाडकर या विद्यार्थ्यांने शिवाजी महाराज यांची वेशभूषा धारण करून थोडक्यात त्यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकला. यावेळी त्याने 'जय भवानी जय शिवाजी' नारा लावला.

या कार्यक्रमाचे संचालन सान्वी सहारे या विद्यार्थीनीने केले. या प्रसंगी शाळेचे शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

**कॉंग्रेस कार्यालय, ब्रम्हपुरी :** स्वराज्य निर्माते, बहुजन प्रतिपालक, कुळवाडी भूषण, छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती ब्रम्हपूरी येथील तालुका कॉंग्रेस कमिटीच्या कार्यालयात साजरी करण्यात आली. यावेळी उपस्थित मान्यवरांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

शहर कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष हितेंद्र राऊत, नगराध्यक्ष योगेश मिसार, शहर कॉंग्रेस कार्याध्यक्ष सुधाकर पोपटे, जिल्हा कॉंग्रेस सचिव वासुभाऊ सोंदरकर, जिल्हा कॉंग्रेस सहसचिव गाजी पटेल, अनुसूचित जाती सेलचे जिल्हा सरचिटणीस डि.के.मेश्राम, माजी नगरसेवक जगदीश आमले, शहर कॉंग्रेसचे सोमेश्वर उपासे, गिरीश बुराडे, कॉंग्रेस कार्यालय प्रमुख सुधीर पंदीलवार, सुरेश वंजारी यांसह कॉंग्रेस पदाधिकारी उपस्थित होते.

**श्री छत्रपती शिव जयंती उत्सव मंडळ, अडयाळ जाणी :** दरवर्षी प्रमाणे यावर्षी सुद्धा श्री छत्रपती शिव जयंती उत्सव मंडळातर्फे १७ ते १९ फेब्रुवारी २०२६ ला तीन दिवशीय शिवजयंती उत्सवाचे आयोजन केले होते. त्यामध्ये १७-१८ फेब्रुवारी ला रात्रकालीन महिला व पुरुष कबड्डी स्पर्धा घेण्यात आली. १९ तारीख ला शिवजयंती उत्सव साजरा करण्यात आला.

१९ फेब्रुवारी ला सकाळी युवकांद्वारे गावात ग्रामस्वच्छता घेण्यात आली, नंतर जी. प. प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांचे भाषण स्पर्धा घेण्यात आली, त्यानंतर महाराजांच्या प्रतिमेचे पूजन व मार्गदर्शन सोहळयाला प्रारंभ झाला. या कार्यक्रमाला मार्गदर्शक म्हणून तेजसजी दोनाडकर ब्रम्हपुरी, गणेशजी बगमारे सामाजिक कार्यकर्ते ब्रम्हपुरी, कार्यक्रमाचे अध्यक्ष सुबोधदादा मार्गदर्शक व संचालक भु-वैकुंठ अड्याळ टेकडी, उपाध्यक्ष नामदेवजी लांजेवार उपसरपंच अड्याळयांची उपस्थिती होती. हिमांशू निमगडे यांनी कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आले.

तीन दिवसात विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते त्यात विजेत्या उमेदवाराचे, संघाचे पारितोषिक देऊन सत्कार करण्यात आले व बाकी सर्व सहभाग घेणाऱ्या उमेदवार व संघाना प्रोत्साहन पर बक्षीस दिले.

**डॉ. पंजाबराव देशमुख कन्या कनिष्ठ महाविद्यालय :** स्थानिक श्री. श्रावणजी बगमारे शिक्षण संस्था ब्रम्हपुरी द्वारा संचालित डॉ. पंजाबराव देशमुख कन्या कनिष्ठ महाविद्यालय तथा डॉ. पंजाबराव देशमुख कॉन्व्हेट ब्रम्हपुरी यांच्या संयुक्त विद्येमानाने रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९६ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आला. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पुजन व मालार्पन करून कार्यक्रमाची सुरवात करण्यात आली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रा. प्रकाशराव बगमारे, संस्थेच्या उपाध्यक्ष तथा प्राचार्या मानिषाताई बगमारे, महाविद्यालयाच्या प्राचार्य शारदाताई ठाकरे आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे संचालन केले नीलिमा गुज्जेवार व आभार प्रदर्शन नेहा नवघडे यांनी केले. कार्यक्रम यश्ववितेसाठी कामिनी कन्नमवार, देवकन्या रुईकर, काजल राऊत, शारदा देशमुख आदीने सहकार्य केले.

**ऑरेंज सिटी व वृंदावन कॉलनी, ब्रह्मपुरी :** ऑरेंज सीटी व वृंदावन कॉलनी आरमोरी रोड ब्रह्मपुरी येथे दरवर्षीप्रमाणे या वर्षी सुद्धा मोठ्या उत्साहामध्ये हिंदवी स्वराज्याचे संस्थापक, रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांची शिवजयंती महोत्सव साजरी करण्यात आली. शिवजयंती महोत्सव निमित्त महिलांचे व बालगोपालाचे विविध कार्यक्रम तसेच महिला भजनाचा कार्यक्रम, शिवजन्मोत्सव, वार्डातील ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार सोहळा, बालगोपालांचे सांस्कृतिक कार्यक्रम व छत्रपती शिवाजी महाराजांची रॅली काढून उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाचे उद्घाटक सिद्धेश्वर भर्रे, प्रमुख मार्गदर्शक व सत्कारमूर्ती नगरसेवक अविनाश राऊत, प्रमुख अतिथी म्हणून प्रकाशजी दुपारे, रमणलाल बेद्रे, पत्रकार गोवर्धन दोनाडकर व अन्य मान्यवर उपस्थित होते. प्रसंगी ज्येष्ठ नागरिकांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

**शिवआदर्श मित्र मंडळ लाडज :** तालुक्यातील लाडज येथे शिवआदर्श मित्र मंडळ लाडज जुनी यांच्या वतीने भव्य शिवजन्मोत्सव सोहळा व गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. कार्यक्रमाला गावकऱ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली.

या कार्यक्रमाचे प्रमुख व्याख्याते म्हणून ब्रह्मपुरी येथील बुद्ध-शिव-फुले-शाहू-आंबेडकर विचारवंत व युवा सामाजिक कार्यकर्ता विहार मेश्राम यांनी जाहीर व्याख्यान दिले. त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या विचारांचे आजच्या युगातील महत्त्व अधोरेखित करताना स्वराज्य, न्याय, धर्मनिरपेक्षता, स्त्रीसन्मान आणि सुशासन या मूल्यांची आजच्या समाजात अंमलबजावणी कशी करता येईल यावर प्रभावी मार्गदर्शन केले.

# कुर्झा प्रभागात मॅरेथॉन स्पर्धा व विविध कार्यक्रम

ब्रम्हपुरी/का.प्र.

महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजांच्या सन्मानार्थ ब्रम्हपुरी



(कुर्झा प्रभाग)येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून कुर्झा महालक्ष्मी नगर, विद्यानगर उत्सव समितीच्या वतीने १४, १० वर्षे वयोगटातील तसेच खुला गटातील महिला व पुरुष तसेच मुला मुलींची मॅरेथॉन दौड स्पर्धा व कुर्झा वार्डातील शिवाजी महाराज चौकात सार्वजनिक शिवजयंती उत्सव समितीच्या वतीने रयतेचे राजे शिवाजी महाराजांच्या ३९६ व्या जयंतीनिमित्त भव्य तीनदिवसीय शिवजयंती उत्सवाचे कार्यक्रम संपन्न झाले.

भौदया राईस मिल ते जगनाडे महाराज चौक विठ्ठल रुक्मिणी मंदिर कुर्झा या मार्गावरून छत्रपती शिवरायांचा जयजयकार करीत अनेक स्पर्धक हिरहिरीने सहभागी झाले होते. स्पर्धेची सुरुवात नगराध्यक्ष योगेश मिसार, ब्रम्हपुरीचे प्रथम नगराध्यक्ष तथा उद्योजक अशोक भैय्या व इतर मान्यवरांनी हिरवी झेंडी दाखवून केली. व्यासपिठावर नगराध्यक्ष योगेश मिसार, विलास विखार, अविनाश राऊत, प्रकाश खोब्रागडे, बबिता आमले, सागर आमले सर्व नगरसेवक मंडळी तसेच क्रिष्णा वैद्य पत्रकार, मोहनीश उराडे सर, शरद जिभकाटे सर, डॉ. सागर माकडे, लक्ष्मण जिभकाटे व क्रीडा प्रशिक्षक राहुल जुआरे, महेश देसाई, महेश फटिंग, हेमंत फटिंग, गौरव लाखे, भास्कर मल्लेवार उपस्थित होते.

मान्यवरांच्या हस्ते विजेत्या स्पर्धकांना सन्मान चिन्ह व रोख पारितोषीक देऊन प्रोत्साहित करण्यात आले. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय धावपटू तयार व्हावे या उद्देशाने असे उपक्रम समितीतर्फे आयोजित केले जातील असा मानस शिव उत्सव समिती महालक्ष्मी नगर, विद्यानगर आयोजकांनी व्यक्त केला.

# ब्रम्हपुरी-आरमोरी रेल्वे फाटकावर पुर्णवेळ वाहतुक पोलीसाची नियुक्ती करा



ब्रम्हपुरी/का.प्र.

ब्रम्हपुरी- आरमोरी रोडवरील रेल्वे फाटकावर गोंदिया-चांदाफोर्ट लोहमार्गावरील वाहतुक मोठया प्रमाणात वाढल्यामुळे येथील रेल्वे फाटक वारंवार बंद करण्यात येते. त्यामुळे त्या मार्गावरील दोन्ही बाजुंना मोठया प्रमाणात वाहतुक कोंडी निर्माण होते. या वाहतुक कोंडीचा शालेय विद्यार्थी, रूग्ण, ये-जा करणारे कर्मचारी, कामगार वर्ग, रूग्ण वाहिका, विद्यार्थीच्या बसेस तसेच इतर वाहन धारकांना मोठ्या प्रमाणात सामना करावा लागतो. या भागातील वाहतुकीला नियंत्रित करण्यासाङ्गी या जागेवर पूर्ण वेळ वाहतुक पोलीस कार्यरत असावयास हवा.

सध्या स्थितीत या महामार्गावर निर्माणाधिन उड्डाण पुलाचे बांधकाम चालू असल्यामुळे मोठया प्रमाणात वाहतुक कोंडी निर्माण होते. या वाहतुक कोंडीमुळे मोठया अपघाताची शक्यता नाकारता येत नाही. या ठिकाणी वाहतुक हवालदाराची नेमणुक नसल्याने वाहनधारक बेजबाबदारीने वाहने चालवितात आणि कोणत्याही वाहतुक नियमाचे पालन करीत नाही. म्हणुन सदर रेल्वे फाटकेवर वाहतुक कोंडी टाळुन नागरीकांना शिस्तबध्द आणि सुलभ प्रवास करण्याकरीता वाहतुक हवालदाराची पुर्ण वेळ नियुक्ती करण्यात यावी यासाठी मा. प्रमोद बानबले पोलीस निरीक्षक पोलीस स्टेशन ब्रह्मपुरी यांना निवेदन देण्यात आले.

निवेदन देतांना ब्रम्हपुरीचे नगराध्यक्ष योगेश मिसार, वासुदेव सोदरकर, संदीप राऊत, भास्कर उरकुडे, गोवर्धन दोनाडकर, शामराव भानारकर, क्रिष्णा राऊत व अन्य ब्रम्हपुरीवासिय उपस्थित होते.

# ओव्हरलोड रेतीची वाहतूक करणारे दोन ट्रक जप्त

## ६१ लाखांचा मुद्देमाल जप्त

ब्रम्हपुरी/का.प्र.

मिळालेल्या माहितीनुसार, १९ फेब्रुवारी २०२६ रोजी ब्रम्हपुरी पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक रेवणसिद्ध कदम, पोलीस अंमलदार परमेश्वर नागरगोजे आणि प्रशांत दरेकर हे पथक सरकारी वाहनाने पेट्रोलिंगवर होते. रात्री ८:१५ वाजताच्या सुमारास ब्रम्हपुरीकडून नागभीडकडे जाणारे दोन संशयास्पद ट्रक त्यांना दिसले. पोलिसांनी दोन्ही ट्रकला थांबवून तपासणी केली असता धक्कादायक माहिती समोर आली. ट्रकचालक जुनेद खान मोहम्मद खान (३८, रा. अमरावती) याच्याकडे (ट्रक क्र. NL-01AD 7786) मध्ये ७ ब्रास रेतीचा परवाना होता. मात्र, प्रत्यक्ष ट्रकमध्ये १० ब्रासपेक्षा जास्त रेती आढळून आली. परवान्यापेक्षा जास्त रेतीची (ओव्हरलोड) चोरटी वाहतूक ही रेती गडचिरोली जिल्ह्यातील साखरा घाटातून अंजनगाव सुरजी येथे नेली जात होती.

तर दुसऱ्या घटनेत ट्रकचालक वकार अहेमद शेख युनूस (३४, रा. अमरावती) याच्याकडे(ट्रक क्र. MH-12.RN-9577) मध्ये ही केवळ ७ ब्रासचा परवाना होता, पण ट्रकमध्ये १० ब्रासपेक्षा जास्त रेती भरलेली होती. ही रेती अंजनगाव पारडी येथे नेण्यात येत होती. ब्रम्हपुरी पोलिसांनी नागभीड रोडवरील कमल हॉटेलजवळ केलेल्या या कारवाईत ट्रकसह २० ब्रास रेती असा एकूण ६१ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. परवान्याची मर्यादा ओलांडून शासनाची फसवणूक आणि अवैध रेती वाहतूक केल्याप्रकरणी भारतीय न्याय संहिता (BNS) कलम ३०३(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# डॉ. आंबेडकर महाविद्यालयात गाडगे महाराज जयंती

ब्रम्हपुरी/का.प्र.

स्थानिक डॉ. बाबासाहेब आंबेडकर कॉलेज ऑफ आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स, ब्रम्हपुरी येथे संत शिरोमणी गाडगे महाराज यांच्या जयंती निमित्त अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर शिक्षण संस्थेच्या सदस्या प्रा. डॉ. स्निग्धा कांबळे यांनी संत गाडगे महाराज यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून अभिवादन केले. प्रसंगी उपस्थित विद्यार्थी, प्राध्यापकवृंद तथा सर्व शिक्षकेतर कर्मचारी यांनी देखील संत गाडगे महाराजांना वंदन करून त्यांच्या कार्याला सलाम केला.

# भगवानपूर येथे धम्म उपासक प्रशिक्षण शिबीर

ब्रम्हपुरी/का.प्र.

तालुक्यातील भगवानपूर येथे दहा दिवसीय शिबिराचे उद्घाटन भारतीय बौद्ध महासभा तालुका शाखा ब्रम्हपुरीचे अध्यक्ष इंजि.मोहन नंदेश्वर यांचे अध्यक्षतेखाली उद्घाटक लोमेश खोब्रागडे, सरचिटणीस जिल्हा चंद्रपूर पूर्व व सहउद्घाटक मेजर जनरल अनिल मेश्राम, उपाध्यक्ष(संरक्षण) जिल्हा चंद्रपूर पूर्व यांचे हस्ते पार पडले.

कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून शिबिराच्या मार्गदर्शिका अल्काताई मेंढे, नारायण उके सचिव, झगडीदास रामटेके, सुभाष सहारे, सिद्धार्थ शेंडे, शालिनीताई सोरदे, सचिन खोब्रागडे, हर्षाताई नगराळे, संघटिका सरिताताई जांभूळकर, शंभरकर साहेब, ॲड.दिलीपजी माटे उपस्थित होते.

प्रास्ताविक सुभाष सहारे तर आभार प्रदर्शन रमेश बारसागडे यांनी केले. या कार्यक्रमाचे आयोजनासाठी योगिताताई बारसागडे यांनी मोलाचे सहकार्य केले. या प्रशिक्षण शिबिराला बहुसंख्य गावातील व परिसरातील बौद्ध बांधव उपस्थित होते.

नियमित वाचा
अर्धसाप्ताहिक ब्रम्हपुरी समाचार

# संत गाडगे महाराज जयंती साजरी

ब्रम्हपुरी/का.प्र.

येथे २३ फेब्रुवारीला राष्ट्रसंत गाडगे महाराज यांच्या जयंतीचे आयोजन करण्यात आले. या वेळेस संस्थेचे अध्यक्ष देवेन्द्रजी पिसे यांच्या हस्ते राष्ट्रसंत गाडगे महाराज्यांच्या प्रतिमेचे पुष्प व पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. प्राचार्य डॉ. सचिन दुधे आणि प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी गाडगे महाराज यांच्या प्रतिमला आदरांजली वाहिली.

## ... QUOTES ...

"I suppose leadership at one time meant muscles; but today it means getting along with people."

- Mahatma Gandhi

## चारोळी

आम्ही देशाला लुटतो
तुम्ही परस्परांना लुटा...
आम्ही 'जेब भरो' करतो,
तुम्ही 'जेल भरो' करा...

रचनाकार : डॉ. राजन जयस्वाल

# राष्ट्रीय स्तरावरील ॲबॅकस स्पर्धेत एलएमबी पब्लिक स्कुलच्या विद्यार्थ्यांचे सुयश

ब्रम्हपुरी/का.प्र.

येथील एल. एम. बी. पब्लिक स्कुलच्या विद्यार्थ्यांनी दिनांक २४ ते २६ जानेवारी



२०२६ रोजी पार पडलेल्या राष्ट्रीय स्तरावरील ॲबॅकस स्पर्धेत सुयश मिळविला.

शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांचा बौध्दिक विकास होण्यासाठी शाळेत विविध स्पर्धा आयोजित केल्या जातात. त्यातून काही विद्यार्थी हे तालुका, राज्य, राष्ट्र स्तरावर उर्तीण होऊन शाळेचे नावलौकीक करतात. ॲबॅकस स्पर्धा परीक्षेत एल. एम. बी. स्कुलच्या ३ तीन विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय स्तरावर प्राविण्य प्राप्त केले. ग्रुप A मधून इयत्ता ५ वी मरक्युरी चा अन्वेश प्रशांत खानोरकर या विद्यार्थ्यांने आपली परीक्षा १७६ सेकंद मध्ये पार पाडून ५४४ सेकंद वाचवून पहिला क्रमांक पटकाविला. त्यानंतर इयत्ता ५ वी मार्सची देवांशी पवन कलमकर या विद्यार्थीनीने आपली परीक्षा १७७ सेकंदामध्ये पार पाडून ५४३ सेकंद वाचवून दुसरा कमांक पटकाविला. ग्रुप २ मधून इयत्ता २ री ॲप्पल ची कु. कनिष्का प्रशांत खानोरकर या विद्यार्थीनीने ७६ सेकंद मध्ये परीक्षा पार करून २८४ सेकंद वाचवून पहिला क्रमांक मिळविला.

विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या यशाबद्दल शाळेचे मुख्याध्यापक कादिर कुरेशी सर, उपमुख्याध्यापिका रश्मी राठी मॅडम, पर्यवेक्षिका रश्मी झोडे मॅडम यांनी या विद्यार्थ्यांना शिल्ड देऊन त्यांच्या गौरव केला. या प्रसंगी शाळेचे सर्व शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी सर्व विजेत्यांना अभिनंदन करून पुढील वाटचाली करिता शुभेच्छा दिल्या.

# 'माझी वसुंधरा'मध्ये ब्रम्हपुरी नगर परिषदेचा डंका

## नागपूर विभागातून अव्वल तर अख्ख्या महाराष्ट्रातून ११ व्या क्रमांकावर




ब्रम्हपुरी/का.प्र.

पर्यावरण संवर्धन आणि शाश्वत विकासाच्या दिशेने पाऊले उचलणाऱ्या नगर परिषद ब्रम्हपुरीने 'माझी वसुंधरा अभियान ५.०' अंतर्गत देदीप्यमान यश संपादन केले आहे. २५ ते ४० हजार लोकसंख्या गटामध्ये उत्कृष्ट कामगिरी करत ब्रम्हपुरी नगर परिषदेने नागपूर विभागात प्रथम, तर राज्यात ११ वा क्रमांक पटकावला आहे. या ऐतिहासिक कामगिरीबद्दल नगर परिषदेला ७५ लाख रुपयांच्या भरघोस पारितोषिकाची घोषणा करण्यात आली आहे.


महाराष्ट्र शासनाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या या अभियानात ब्रम्हपुरीने पर्यावरणाचे पंचतत्व जपण्यासाठी विशेष प्रयत्न केले. या यशामागे प्रामुख्याने उपक्रमांचा मोठा वाटा राहिला आहे. यात घनकचरा व्यवस्थापन प्रणाली अधिक सक्षम करून ओला व सुका कचरा वर्गीकरणावर भर दिला. शहरात प्लास्टिक प्रतिबंधाबाबत व्यापक जनजागृती मोहीम राबवण्यात आली. मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण करून शहराच्या हरित क्षेत्रात वाढ करण्यात आली. पाणी बचतीसाठी आणि जलस्त्रोत पुनरुज्जीवनासाठी प्रभावी उपाययोजना करण्यात आल्या.

या अभियानाची यशस्वी अंमलबजावणी तत्कालीन मुख्याधिकारी अर्शिया जुही यांच्या कार्यकाळात अत्यंत प्रभावीपणे करण्यात आली होती. त्यांच्या नियोजनामुळेच या मोहिमेला गती मिळाली. सध्याच्या मुख्याधिकारी डॉ. माधुरी सलामे यांनी हे यश अधिकारी, कर्मचारी आणि शहरवासीयांच्या सांघिक प्रयत्नांचे फळ असल्याचे म्हटले आहे.

विदर्भातील ब्रह्मपुरी नगर परिषदेने राज्यस्तरावर आपली छाप पाडल्याने शहरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. या पुरस्कारामुळे शहराच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून, आगामी काळात ब्रम्हपुरी एक 'मॉडेल इको-फ्रेंडली शहर' म्हणून नावारूपास येईल, अशी आशा व्यक्त केली जात आहे.

Miracle constructions & Developers
श्रीराम नगरी - डेव्हलपर्स
NATP प्लॉट्स उपलब्ध
सिंदेवाही
नवरगांव
तळोधी
चंद्रपुर (चौराळा)

संपर्क : अनिल दोनाडकर
मो. 8806776699, 9834946501
डुप्लेक्स बांधकाम करून मिळेल.

प्रो.प्रा. सुरेश सोरते
मो. 8698323337
सोरते स्टेनलेस स्टील वर्क्स
गीत (बुरले) पेट्रोल पंपसमोर
नागभीड रोड, ब्रम्हपुरी
रेलींग, ग्रिल व गेट
स्टिलचे नावे बनवून मिळेल.



# नितीन सडमाके यांना राज्यशास्त्र विषयात पीएच.डी.



ब्रम्हपुरी/का.प्र.

तालुक्यातील मेंडकी येथील सुपुत्र व सध्या जि.प. उच्च प्राथमिक शाळा, वांद्रा (ता. ब्रम्हपुरी) येथे प्राथमिक शिक्षक म्हणून कार्यरत असलेले नितीन वनिता तुळशिराम सडमाके यांना राज्यशास्त्र विषयात पीएच.डी. पदवी प्रदान करण्यात आली आहे. २३ फेब्रुवारी २०२६ रोजी संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ येथे झालेल्या ४२ व्या दीक्षांत समारंभात, मानवविज्ञान विद्याशाखेअंतर्गत राज्यशास्त्र विषयात त्यांना ही पदवी बहाल करण्यात आली.

नितीन सडमाके हे आपल्या वडिलांच्या शिक्षणविषयक शिस्तीचे हे फलित असल्याचे नम्रपणे मान्य करतात. त्यांनी D.Ed., B.Ed., D.S.M. यांसह राज्यशास्त्र, शिक्षणशास्त्र, इतिहास व इंग्रजी या विषयांत पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले असून त्यांचे शैक्षणिक वाटचाल आजही सुरू आहे.

पीएच.डी.साठी त्यांनी 'जातिव्यवस्था, स्त्रिया, रोजगार आणि शिक्षण या संदर्भात कार्ल मार्क्स आणि डॉ. बी. आर. आंबेडकर यांच्या राजकीय विचारांचे तुलनात्मक अध्ययन' हा संशोधन विषय निवडला होता. हे संशोधन त्यांनी शासकीय विदर्भ ज्ञान-विज्ञान संस्था (स्वायत्त), अमरावती येथील राज्यशास्त्राचे प्राध्यापक डॉ. के. एच. वासनिक यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केले.

सध्या नितीन सडमाके हे जि.प. चंद्रपूर अंतर्गत जि.प. उच्च प्राथमिक शाळा, वांद्रा (ता. ब्रम्हपुरी) येथे प्राथमिक शिक्षक म्हणून कार्यरत आहेत.


Lubi PUMPS-MOTORS
बुधवार बंद
- दुकानाची वेळ - सकाळी १० ते सायं. ६ वा.
सी.आर.आय. मोटारपंपचे विदर्भातील प्रथम अधिकृत विक्रेता
गणेश ॲग्रीकल्चरल एजन्सी
रेल्वे स्टेशन रोड, खानोरकर भवन, भगतसिंग चौक, ब्रम्हपुरी
फोन नं. (07177) 272573 मोबाईल क्र. 9423115853, 7083214053
Kirloskar
CRI
ISO : 9001 : 2015 मानांकन प्राप्त दुकान
1994 पासून आपल्या सेवेत
किर्लोस्कर, एनसंस, लुबी, मोटार पंप, उषा, होन्डा, कॉमेट इंजीन, राज पी.व्ही.सी. पाईप, स्प्रिंकलर पाईप, आटा चक्की, हॅण्डपंप, केबल वायर व स्पेअर पार्टचे विक्रेता

Printed by Rajiv Pachpor published by Ashok Kisanlalji Bhaiya on behalf of Ashok Kisanlalji Bhaiya and printed at Aqua Process, Modi No.1, Sitabuldi, Nagpur and Published at Bramhapuri Samachar Office, Wadsa Road, Bramhapuri Editor Ashok Kisanlalji Bhaiya MAHMUL/2016/69789 Mob. 9422135404